SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, (MAHARASHTRA)
DEPARTMENT OF MARATHI
**PHONE**: Office - (0231) 2609215, Head Of Department - (0231) 2609213
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर : ४१६००४ (महाराष्ट्र)
मराठी विभाग
**दूरध्वनी**: कार्यालय - (०२३१) २६०९२१५, विभागप्रमुख : (०२३१) २६० ९२१३

NAAC A++
GRADE WITH
CGPA 3.52

जा. क्र. : शिवाजी वि/ मराठी विभाग/ ४१७ दि. २६/०९/२०२६

**महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ**

**आणि**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

**अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय**

**मराठी मुक्तज्ञानकोश : डिजिटल लेखन स्पर्धा**

दि. ०१ ऑक्टोबर, २०२६ वेळः सकाळी ११.०० वाजता

**प्रति,**
**मा. प्राचार्य/ विभागप्रमुख/ विद्यार्थी मित्र-मैत्रिणींना,**
…………………………………………
…………………………………………
…………………………………………

**महोदय,**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान, आस्था व आत्मीयता निर्माण व्हावी, मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेची जाणीव व्हावी. तसेच विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्याला व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने अभिजात मराठी दिन २०२६ निमित्त राज्यस्तरीय ऑनलाइन **मराठी मुक्तज्ञानकोश : डिजिटल लेखन स्पर्धेचे** आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे. यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे, ही विनंती.

**स्पर्धेचे नियम, विषय व स्वरूप**

**स्पर्धा दिनांक :** ०१ ऑक्टोबर, २०२६

**सहभाग :** महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यापीठ विद्यार्थी (पदवी व पदवी पातळीवरील)

**मुख्य उद्दिष्टः** अभिजात मराठीची परंपरा, आधुनिक मराठी, कृत्रिम बुद्धिमत्ता व नवे तंत्रज्ञान यांचा विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सर्जनशील संगम घडवणे.

**कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे :**

१) अभिजात मराठी साहित्य, भाषा आणि सांस्कृतिक परंपरेची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान आणि सर्जनशील सहभाग निर्माण करणे.

३) मराठी भाषा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा संबंध विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगातून समजावणे.

४) मराठीतील कविता, कथा, लोकसाहित्य, बोलीभाषा आणि सांस्कृतिक वारसा डिजिटल माध्यमाशी जोडणे.

५) विद्यार्थ्यांना विविध डिजिटल माध्यमे, समाजमाध्यमे इत्यादी माध्यमांच्या आधारे मराठीतून व्यक्त होण्याची संधी देणे.

**कार्यक्रमाची संकल्पना**

मराठी भाषा ही समृद्ध लोकसंस्कृती व साहित्यिक वारसा लाभलेली भाषा आहे. अभिजात मराठीच्या माध्यमातून भाषेची प्राचीन परंपरा, संतवाङ्गय, लोकपरंपरा तसेच आजपर्यंतच्या समृद्ध साहित्यविश्वाची ओळख विद्यार्थ्यांना करून देता येईल. समकालीन मराठी भाषेमध्ये युवा साहित्य, विविध बोलीभाषा तसेच समाज माध्यमांवरील मराठीचे नवे व विकसित रूप दिसून येते. बदलत्या मराठीचा परिचय युवकांना आधुनिक उपक्रमांच्या माध्यमातून करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठी भाषा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा संगम हा भाषेच्या भविष्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. बोलीभाषा ही मराठीच्या भाषिक वैविध्याची महत्त्वाची ओळख आहे. विविध प्रदेशांतील बोली, शब्द, उच्चार, म्हणी, वाक्प्रचार व लोकसाहित्य यांचे डिजिटल संकलन यानिमित्ताने करता येईल. तसेच युवकांना या प्रक्रियेत सहभागी करून त्यांच्या मनात भाषेविषयी अभिमान आणि सर्जनशीलता निर्माण करता येईल. आंतरजालावरील विविध संवादमाध्यमे व समाजमाध्यमे यांसारख्या लोकप्रिय माध्यमांच्या आधारे मराठीला नव्या पिढीशी जोडता येईल. युवकांनी स्वतः मराठी डिजिटल सामग्री तयार करून ती समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा प्रभावी उपक्रम ठरू शकतो. मराठीला केवळ साहित्याची भाषा न ठेवता ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यवसायाची भाषा बनविणे आवश्यक आहे. तंत्रस्नेही युवापिढीला मराठी भाषेच्या ज्ञानधिष्ठित प्रवाहात समाविष्ट करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. परंपरा जपत आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारल्यास मराठीची व्याप्ती राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर वाढू शकते. "अभिजात मराठीच्या समृद्ध परंपरेतून प्रेरणा, वर्तमानातून सर्जनशीलता आणि तंत्रज्ञानाशी जोडलेली भविष्यातील मराठी" ही या संपूर्ण उपक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

**मराठी मुक्तज्ञानकोश : डिजिटल लेखन स्पर्धा**

**स्वरूप :** विद्यार्थ्यांनी मराठीतील एखाद्या विषयाची डिजिटल स्वरूपात माहिती तयार करावी व स्पर्धेच्या वेळी तिचे ३ मिनिटांत वाचन/सादरीकरण करावे. लिखित मजकूर स्पर्धेपूर्वी आयोजकांकडे डिजिटल मंचावर अपलोड करणे आवश्यक असेल.

**स्पर्धेसाठी विषय :**

**अ) स्मरण : शताब्दी लेखकांचे**

१) व्यंकटेश माडगूळकर

२) नारायण सुर्वे

३) भाऊ पाध्ये

४) म. द. हातकणंगलेकर

**ब) ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यकृती**

१) ययाति - वि. स. खांडेकर

२) नटसम्राट - वि. वा. शिरवाडकर

३) अष्टदर्शने - विंदा करंदीकर

४) हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ - भालचंद्र नेमाडे

**क) लोकसाहित्याचे प्रादेशिक आविष्कार**

**ड) लोकप्रिय साहित्य**

२) पु. ल. देशपांडे

३) व. पु. काळे

४) शिवाजी सावंत

५) रणजीत देसाई

**इ) मराठी : अभिजात भाषा- साहित्य संशोधन**

(मराठी भाषेच्या अभिजाततेबद्दल संशोधकांनी केलेले संशोधन)

**ई) शोध भक्तिवाङ्मयाचा**

१) महानुभाव वाङ्मय

२) वारकरी वाङ्मय

**स्पर्धेचे नियम :**

१. सदर स्पर्धेचे सादरीकरण ३ मिनिटांत करणे आवश्यक आहे. ध्वनिचित्रफीतीच्या (व्हिडिओ) माध्यमातून सादरीकरण करावे. (विद्यार्थ्यांनी सादरीकरणाची ध्वनिचित्रफीत तयार करून स्पर्धेच्या वेळी आभासी (ऑनलाइन) पद्धतीने दाखविणे आवश्यक आहे.)

२. आयोजकांनी निश्चित केलेल्या डिजिटल मंचावर विद्यार्थ्यांनी सादरीकरण करणे आवश्यक आहे.

३. लेखासोबत शीर्षक, संदर्भसूची तसेच आवश्यक असल्यास छायाचित्रे, तक्ते, नकाशे किंवा इतर संकेतस्थळ आदींची माहिती जोडणे अनिवार्य आहे.

४. मजकूर अन्य साहित्यातून जसाच्या तसा घेतला असल्यास वा साहित्यचौर्य आढळल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

५. विषयाची निवड, माहितीची अचूकता व विश्वासार्हता, संशोधनाची गुणवत्ता, मराठी भाषेचा वापर, लेखनशैली, संदर्भाचा योग्य वापर, मजकुराची मांडणी, ज्ञानमूल्य या निकषांवर मूल्यमापन केले जाईल.

६. परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

७. लिखित मजकूर दि. ३०/०९/२०२६ रोजी पर्यंत आयोजकांकडे पाठवणे आवश्यक आहे.

**१. सदर स्पर्धा google meet वर घेतली जाईल.**

**२. स्पर्धेची लिंक - ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली त्यांना एकदिवस आधी कळविण्यात येईल.**

**३. नावनोंदणीत मोबाईल नंबर व अचूक मेल आयडी द्यावा.**

**स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील लिंकला स्पर्श करा आणि आपला सहभाग नोंदवा.**

**https://forms.gle/9UMq8SESLLhNqC1J8**

**समन्वयक**

**डॉ. सुखदेव एकल**
भ्रमणध्वनी: ९०९६४३०७२३
मेल आयडी : marathi@unishvaji.ac.in

**श्री. सुयश भुरे पाटील**
भ्रमणध्वनी: ९१४५२००९४९
मेल आयडी: smb.rs.marathi@unishivaji.ac.in